नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १०९ Issue - 109 | वार शुक्रवार दि. ५ सप्टेंबर २०२५ Blow- Friday Date 5 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ओबीसीला धक्का नाही; मराठा आरक्षण सरसकट नसल्याचे मुख्यमंत्र्यांचे स्पष्टीकरण

### शासन निर्णयाचा ओबीसी समाजावर कुठलाही परिणाम होणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : माझ्या गरीब मराठ्यांना ओबीसींमध्ये मी समाविष्ट करणार. कोणी कितीही उपसमित्या बनवल्या, तरीही आम्हाला आरक्षण मिळणारच,' असे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही गुरुवारी आपली स्पष्ट भूमिका मांडली. 'मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारने काढलेला शासन निर्णय हा सरसकट नसून तो पुराव्यांशी संबंधित आहे. कुणबी असल्याचे पुरावे असणाऱ्यांनाच त्याचा लाभ होईल. यामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का बसणार नाही. या समाजाचे कोणतेही नुकसान होणार नाही,' अशी ग्वाही त्यांनी दिली.

काहींना हे समाजासाठी धोकादायक वाटत आहे, तर काहींना सरकारची भूमिका अयोग्य वाटत आहे. छगन भुजबळ यावरून नाराज आहेत. त्यांनी बुधवारच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कारही घातला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी प्रसारमाध्यमासमोर भाष्य केले.

'भुजबळ मंत्रिमंडळ बैठकीतून कुठेही निघून गेले नाहीत. माझी त्यांच्याशी चर्चा झाली आहे. मी त्यांना आश्वस्त केले आहे. शासन निर्णयाचा ओबीसी समाजावर कुठलाही परिणाम होणार नाही. हा सरसकट शासन निर्णय नाही. पुराव्याचाच आदेश आहे. फक्त



मराठवाड्यामध्ये निजामाचे राज्य होते. त्यामुळे इंग्रजांच्या राज्याचे पुरावे हे इतर ठिकाणी मिळतात. मराठवाड्यात सापडत नाहीत. म्हणूनच निजामाचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. जे खरे कुणबी आहेत, त्यांनाच हा लाभ मिळेल. यामध्ये खोटेपणा करता येणार नाही. त्यामुळे अनेक ओबीसी संघटनांनी या शासन निर्णयाचे स्वागत केले आहे,' असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. 'अनेक वेळा गैरसमजुती होतात. सर्व समाजांना सोबत घेऊन जाण्याचे आमचे ब्रीदवाक्य आहे,' असे त्यांनी अधोरेखित केले.

फडणवीस यांची ग्वाही

ही सत्ता आहे, तोपर्यंत ओबीसींवर अन्याय होणार नाही. मराठ्यांना हवे असलेले आरक्षण देणार, ओबीसींचे आरक्षण तसेच राहणार. खरा अधिकार ज्याचा त्यांना देणार आहोत. दोन समाजांना कधीच एकमेकांविरुद्ध येऊ देणार नाही

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात येऊ नये, या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या साखळी उपोषणाची गुरुवारी सांगता झाली. राज्य सरकारतर्फे ओबीसी खात्याचे मंत्री अतुल सावे यांनी संविधान चौकात आंदोलनस्थळी भेट देऊन महासंघाच्या १४पैकी १२ मागण्या तत्काळ मान्य केल्या. त्यानंतर संघटनेने आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले. हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नसल्याचे आश्वासन सावे यांनीही दिले. तसेच महासंघाच्या मागण्यांसंदर्भात सरकारकडील सविस्तर निवेदन सादर केले.

## सरकारकडून मराठ्यांची फसवणूक? प्रकाश आंबेडकरांनी केला गंभीर आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मागील काही महिन्यांपासून आरक्षण प्रश्न मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. विविध समाजांकडून आरक्षणासाठी रस्त्यावर आणि न्यायालयीन लढाई लढली जात असून यावर राजकीय नेत्यांकडून विविध प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. नुकताच राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत नवा जीआर काढल्यानंतर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आणि ओबीसी आरक्षणाबद्दल भूमिका मांडली. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय म्हणजे सरकारकडून करण्यात आलेली फसवणूक असल्याचा आरोप त्यांनी केला. 'जीआर'च्या आधारावर मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही, असं ते म्हणाले.

'मराठा आणि ओबीसी समाजाचे आरक्षणाचे ताट वेगवेगळे असले पाहिजे. मराठा समाजाने वेगळे आरक्षण मागितले तरच त्यांना आरक्षण मिळू शकते. मात्र, सर्व मराठे कुणबी समजावेत, असा 'जीआर' काढून भाजपने अजित पवार, एकनाथ शिंदे, उद्धव ठाकरे आणि मराठा समाज यांना फसवले आहे,' असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवारी केला. 'ओबीसींना स्वतःच्या हक्कांसाठी आता लढा द्यावा लागेल. आंदोलन, मोर्चे, बैठका घ्याव्या लागतील यासाठी ओबीसी मंत्र्यांनी मंत्रिमंडळात दबाव आणणे गरजेचे आहे,' असंही आंबेडकर म्हणाले. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी हैदराबाद गॅझेट स्वीकारण्याचा शासन निर्णय (जीआर) मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आला. मात्र, त्या आधारे मराठा समाजाला आरक्षण मिळणार नसल्याचे विधिज्ञांचे मत आहे. त्यावर आंबेडकर यांनी गुरुवारी भूमिका स्पष्ट केली.

## ओबीसींच्या १४ पैकी १२ मागण्या मान्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : गेल्या अनेक दिवसांपासून नागपुरात ओबीसी महासंघाचं साखळी उपोषण सुरु होतं. या उपोषणामुळेदेखील सरकारवर मोठा दबाव निर्माण झाला होता. अखेर मंत्री अतुल सावे यांनी उपोषणस्थळी जात आंदोलकांची भेट घेतली. त्यांनी आंदोलकांना योग्य आश्वासन देत उपोषण मागे घेण्याचं आवाहन केलं. त्यांच्या या शिष्टाईत त्यांना यश आलं. तसेच आंदोलाकांनी देखील आपल्या १४ पैकी १२ मागण्या मान्य करुन घेतल्या आहेत.



मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात येऊ नये यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या साखळी उपोषणाची गुरुवारी सांगता झाली. राज्य सरकारतर्फे ओबीसी खात्याचे मंत्री अतुल सावे यांनी संविधान चौकात आंदोलन स्थळी भेट देऊन महासंघाच्या १४ पैकी १२ मागण्या तात्काळ मान्य केल्यानंतर संघटनेने आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले. यावेळी राष्ट्रीय महासंघाचे अध्यक्ष यांनी पाणी पाजल्यानंतर साखळी उपोषणाची सांगता झाली. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आंदोलन मागे घेतल्यानंतरही राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण सुरूच होते. सरकारच्या प्रतिनिधींनी भेट दिल्याशिवाय आंदोलन मागे न घेण्याच्या महासंघाच्या भूमिकेनंतर गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिनिधी म्हणून अतुल सावे यांनी सकाळी साखळी उपोषण स्थळाला भेट दिली. हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागणार नसल्याचे आश्वासन सावे यांनी यावेळी दिले.

मंत्री अतुल सावे यांनी ओबीसी महासंघाच्या मागण्यांसंदर्भात सरकारकडील सविस्तर निवेदन सादर केले. त्यानंतर ओबीसी महासंघाचे प्रमुख बबनराव तायवाडे यांनी साखळी उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. यावेळी ओबीसी आंदोलकांना त्यांच्या मागण्यांवर सरकारच्या वतीने अभिप्राय देण्यात आला आहे. यात विविध मागण्यांवर सविस्तर माहिती सरकारच्या वतीने देण्यात आली आहे.

शासनातर्फे मान्य करण्यात आलेल्या मागण्यांच्या निवेदनात 'राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालामधील क्रमांक ८ मधील शिफारशींच्या अनुषंगाने सर्वच मराठ्यांचा कुणबी म्हणून समावेश करणे योग्य होणार नाही, असा निष्कर्ष नोंदवण्यात आला आहे. आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने १ जून २००४ च्या शासन निर्णयानुसार मराठा कुणबी आणि कुणबी मराठा या जातींचा इतर मागासवर्गाच्या यादीत अनुक्रमांक ८३ वर समावेश करण्यात आला आहे', असे सविस्तर सांगण्यात आले.

सरकारच्या या अभिप्रायानंतर ओबीसी महासंघाने आंदोलन मागे घेत आमचा विजय झाला असे जाहीर केले. महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी हा आमचा विजय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. तर महासंघाच्या दोन मागण्या मुख्यमंत्र्यांकडे पोहोचवल्या जातील, त्यावर मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा केली जाईल, असेही आश्वासन मंत्री अतुल सावे यांनी दिले. तायवाडे यांनी आपल्या मागण्या मान्य झाल्या असल्याचे जाहीर करून उपोषण स्थगितीची घोषणा केली. महासंघाच्यावतीने ज्या ज्या शहरात आंदोलन सुरू आहे त्यांनाही निरोप देऊन आंदोलन थांबवण्याचे सांगण्यात येईल, असे सांगितले.

मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावे आणि आरक्षणाचा लाभ द्यावा यासाठी मुंबईत आंदोलन सुरू केले होते. सरकार त्यांच्या दबावात येऊन मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देईल, अशी भीती वर्तविली जात होती. त्यानंतर तायवाडे यांच्या नेतृत्वात तातडीने महासंघाच्या पदाधिकार्यांची बैठक बोलावली. त्यात ठरल्यानुसार ३० ऑगस्ट पासून नागपूरच्या संविधान चौकात साखळी उपोषण आणि त्यानंतर मुंबईत कूच करून आमरण उपोषण करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता.

## गुंतवणूक आकर्षित करण्याबरोबरच, रोजगार संधी वाढीसाठी कामगार संदर्भातील अधिनियमात सुधारणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ५४ आणि महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

केंद्र सरकारने स्थापन केलेल्या कृती दलाने सुचविलेल्या सुधारणानुसार कारखाने अधिनियम १९४८ मध्ये विविध सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळात मान्यता देण्यात आली. राज्यात गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी हे बदल करण्यात आले आहेत. कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा, उत्तर प्रदेश, त्रिपुरा यासारख्या राज्यांनी हे बदल आधीच केलेले आहेत.

या सुधारणांमुळे जास्त मागणी असलेल्या वेळेस किंवा कामगारांच्या कमतरतेमध्ये कोणत्याही व्यत्ययाशिवाय उद्योगांचे कामकाज चालू राहू शकते. कामगारांना योग्य वेतन संरक्षणासह कायदेशीररित्या अतिरिक्त उत्पन्न मिळेल. कायदेशीर अतिकालिक (ओव्हरटाईम) मर्यादा वाढवून कामगारांना मोबदल्याशिवाय अतिरिक्त काम करण्यास सांगितले जाते, यापासून संरक्षण मिळेल. आता ओव्हरटाईम न देता कामगारांकडून काम करवून घेण्याच्या प्रकाराला आळा बसेल. या बदलामुळे रोजगार निर्मितीस प्रोत्साहन, कामगार हक्कांचे संरक्षण होणार आहे. कामाच्या वेळेबाबत इतर राज्यातील तरतुदीप्रमाणे तरतूद केल्याने नवीन गुंतवणूक आकर्षित होण्यास मदत होईल. अतिकालिक कामाचा कालावधी वाढविल्यामुळे कामगारांनाही मोबदला वेतनाच्या दुप्पट दराने मिळेल.

कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ मध्ये सुधारणा केल्यामुळे कारखान्यातील दैनंदिन कामाच्या तासांची मर्यादा ९ तासांवरून १२ तासांपर्यंत होणार आहे. कलम ५५ मधील सुधारणांमुळे कारखान्यातील विश्रांतीसाठी सुट्टीचा कालावधी ५ तासानंतर ३० मिनिटे याऐवजी ६ तासापर्यंत ३० मिनिटे असा करण्यात आला आहे. कलम ५६ मध्ये सुधारणा करुन आठवड्याच्या कामाचा कार्याचा विस्तार कालावधी साडेदहा तासावरुन १२ तास करण्यात आला आहे. कलम ६५ मधील सुधारणांमुळे अतिकालिक कामाच्या तासाची मर्यादा ११५ तास प्रति तिमाही यावरुन १४४ तास प्रति तिमाही अशी करण्यात येणार आहे. अर्थात अतिकालिक कामासाठी कामगारांची लेखी संमती घेणे आवश्यक असेल, अशी कठोर तरतूद सुद्धा त्यात आहे.

याचबरोबर महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तींचे विनियमन) अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. ही सुधारणा २० आणि त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना लागू राहील. या सुधारणांनुसार दैनंदिन कामाचे तास ९ वरुन १० करणे, त्यास अनुसरुन विश्रांतीच्या सुट्टीच्या कालावधीत बदल करणे, तातडीचे काम सोपविलेल्या कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन साडेदहा तासांवरून १२ तास करणे, अतिकालिक कामाचा कालावधी १२५ तासांवरुन १४४ तास करणे इत्यादी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. या सुधारणांमुळे २० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापनांना नोंदी प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहणार नाही. मात्र केवळ सूचनापत्रांन्वये व्यवसाय सुरु करण्याबाबत अवगत करणे आवश्यक राहील.


सरकारी कामात अडथळा

### १५ ते २० जणांवर गुन्हा दाखल; ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी दिली फिर्याद

## फोन करुन अजित पवारांना अडचणीत आणणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिस्तप्रीय नेते म्हणून आेळख असलेल्या अजित पवारांनी एका महिला पोलीस अधिकाऱ्यास फोनवरुन दादागिरी केली. अजित पवारांच्या या संवादाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, माध्यमांत हे वृत्त झळकल्यानंतर आता संबंधित गावातील शेतकरी आणि फोन लावणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. त्यामुळे, अखेर अजित दादांना अडचणीत आणणाऱ्या कुर्डू येथील १५ ते २० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याचं दिसून आलं. त्यामध्ये, बाबा जगताप, नितीन माळी, संतोष कापरे, अण्णा धाणे यांच्यासह १५ ते २० ग्रामस्थांचा समावेश असून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी, ग्राम महसूल अधिकारी प्रीती शिंदे यांनी फिर्याद दिली आहे.





गावातील मुरूस उपसा करताना अडवणूक केल्यानंतर येथील एका कार्यकर्त्याने थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांना फोन लावून कारवाई थांबविण्याची विनंती केली होती. त्यावेळी, अजित पवारांनीही फोनवरुन संबंधित महिला अधिकाऱ्यास कारवाई थांबवा, मी तुम्हाला आदेश देतो असे म्हणत दादागिरीची भाषा केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यामुळे, अजित पवारांवर टीकेची झोड उठल्याने आता संबंधित ग्रामस्थांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. कुर्डूवाडी पोलीस ठाणे गु.र.नं ३७१/२०२५ बी.एन.एस.चे कलम ३०३(२),३(५) व पर्यावरण संरक्षण अधिनियम ९.१५ प्रमाणे फिर्यादी–प्रीती प्रकाश शिंदे वय २७ वर्ष धंदा नोकरी (ग्राम महसूल अधिकारी कुर्डू) रा. मोडनिंब ता. माढा जिल्हा सोलापूर यांनी याबाबत तक्रारदाखल केली आहे.

कुर्डूतील श्री दादाराव गोरख माने यांची शेती गट नंबर ५७५/१ मधील ०.२० आर जमिनीमधील अंदाजे १२० ब्रास मुरूम रक्कम अंदाजे ७२,००० हजार रुपये, बाहेर काढल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी संगणमत करुन तहसीलदार माढा यांची कोणतीही परवानगी न घेता पर्यवरणाचा ऱ्हास करुन मौजे कुर्ड शेती गट नंबर ५७५/१ मधील शेतकरी श्री दादाराव गोरख माने यांच्या मालकीचे ०.२० आर. जमीनमधील अंदाजे १२० ब्रास मुरुम प्रति ब्रास ६००/- रुपये प्रमाणे एकूण ७२,०००/- रुपयांचा मुरुम अवैद्यरित्या उत्खनन करन चोरी केल्याची तक्रार दाखल झाली आहे. याशिवाय जमाव जमवून सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. माढ्याच्या कुर्डू गावात रस्त्यासाठी मुरुम उत्खनन होत असल्याची तक्रार आल्यानुसार करमाळ्याच्या पोलिस उपअधिक्षक अंजना कृष्णा या घटनास्थळी पोहचल्या. मुरुम उचलण्याच्या मुद्यावरुन कुर्डू गावातील नागरीक आणि अंजली कृष्णा यांच्यामध्ये शाब्दिक जुगलबंदी रंगली. यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबा जगताप या कार्यकर्त्याने थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांना फोन लावून अंजली कृष्णा यांच्या हातात दिला. मात्र त्यांना अजित पवार आणि त्यांचा आवाज ओळखता आला नाही. तिकडून अजित पवार दोनदा सांगताना दिसले की डीसीएम अजित पवार बोल रहा हूं. ये कार्यवाही बंद करो...मेरा आदेश हैं.. त्यावर कृष्णा म्हणतात मेरे फौन पर कॉल करें.. त्यावर पवार म्हणताहेत..की तुम पे अॅक्शन लूंगा.. इतनी डेरिंग है तुम्हारी..मेरा चेहरा तो पेहचानोगा ना.. असे रागावून अजित पवार बोलले ... आणि अजित पवारांनी व्हिडीओ कॉल केला. त्यावर कृष्णा बांधावरच जाऊन बसून पवारांशी बोलताना दिसल्या...यात अजित पवार कारवाई थांबवण्याचे आदेश देत असल्याचे पहायला मिळत असून...माझा फोन आलाय...तहसीलदारांना सांगा असे पवार सांगतात. घटनास्थळी हा प्रकार ३ तास चालू होता. अंजली कृष्णा आणि पवारांच्या संवादाच्या क्लिप व्हायरल झाला आहे. या प्रकरणी पोलिसांकडे कसलीही तक्रार अथवा गुन्हांची नोंद झालेली नाही.

काल दुपारी हा सर्व प्रकार घडला. अवैध मुरूम उपसा सुरू असताना आयपीएस महिला अधिकाऱ्याने तेथे धाड टाकून कारवाई सुरू केली असता अजितदादांच्या कार्यकर्त्यांनी थेट दादांना फोन लावून दिला होता. वास्तविक ग्रामपंचायतच्या परवानगीने मुरूम उपसा होत असल्याची भूमिका ग्रामस्थांची होती, मात्र कोणतीही ग्रामपंचायत अथवा कागदपत्र सादर न झाल्याने महिला आयपीएस अधिकाऱ्याने कारवाई केली होती. दरम्यान, करमाळ्याच्या पोलिस उपअधिक्षक अंजली कृष्णा यांना उपमुख्यमंत्री अजित पवारांना फोनवरुन ओळखता आले नाही. त्यानंतर रागावलेल्या अजित पवारांनी अंजली कृष्णा यांना खडेबोल सुनावत थेट व्हिडीओ कॉलच केला होता.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### मुख्यमंत्र्यांचे स्पष्टीकरण

माझ्या गरीब मराठ्यांना ओबीसींमध्ये मी समाविष्ट करणार. कोणी कितीही उपसमित्या बनवल्या, तरीही आम्हाला आरक्षण मिळणारच,' असे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही गुरुवारी आपली स्पष्ट भूमिका मांडली. 'मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारने काढलेला शासन निर्णय हा सरसकट नसून तो पुराव्यांशी संबंधित आहे. कुणबी असल्याचे पुरावे असणाऱ्यांनाच त्याचा लाभ होईल. यामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का बसणार नाही. या समाजाचे कोणतेही नुकसान होणार नाही,' अशी ग्वाही त्यांनी दिली. काहींना हे समाजासाठी धोकादायक वाटत आहे, तर काहींना सरकारची भूमिका अयोग्य वाटत आहे. छगन भुजबळ यावरून नाराज आहेत. त्यांनी बुधवारच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कारही घातला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी प्रसारमाध्यामासमोर भाष्य केले. 'भुजबळ मंत्रिमंडळ बैठकीतून कुठेही निघून गेले नाहीत. माझी त्यांच्याशी चर्चा झाली आहे. मी त्यांना आश्वस्त केले आहे. शासन निर्णयाचा ओबीसी समाजावर कुठलाही परिणाम होणार नाही. हा सरसकट शासन निर्णय नाही. पुराव्याचाच आदेश आहे. फक्त मराठवाड्यामध्ये निजामाचे राज्य होते. त्यामुळे इंग्रजांच्या राज्याचे पुरावे हे इतर ठिकाणी मिळतात. मराठवाड्यात सापडत नाहीत. म्हणूनच निजामाचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. जे खरे कुणबी आहेत, त्यांनाच हा लाभ मिळेल. यामध्ये खोटेपणा करता येणार नाही. त्यामुळे अनेक ओबीसी संघटनांनी या शासन निर्णयाचे स्वागत केले आहे,' असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. 'अनेक वेळा गैरसमजुती होतात. सर्व समाजांना सोबत घेऊन जाण्याचे आमचे ब्रीदवाक्य आहे,' असे त्यांनी अधोरेखित केले. ही सत्ता आहे, तोपर्यंत ओबीसींवर अन्याय होणार नाही. मराठ्यांना हवे असलेले आरक्षण देणार, ओबीसींचे आरक्षण तसेच राहणार. खरा अधिकार ज्याचा त्यांना देणार आहोत. दोन समाजांना कधीच एकमेकांविरुद्ध येऊ देणार नाही मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात येऊ नये, या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या साखळी उपोषणाची गुरुवारी सांगता झाली.

# बाप्पाला निरोप - श्रध्दा, उत्साह आणि पर्यावरणाची जबाबदारी !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा आत्मा आहे. दहा दिवस भक्तिभावाने घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांत विराजमान झालेल्या गणरायाचा निरोप म्हणजेच गणेश विसर्जन. 'गणपती बाप्पा मोरया, पुन्हा वर्षी लवकर या' या गजरात नाचत-गात, ढोल-ताशांच्या तालावर, फुलांच्या वर्षावात गणेशाच्या मूर्तींचे विसर्जन केले जाते. परंतु या जल्लोषामागे काही गंभीर प्रश्न दडलेले आहेत, जे आपण विसरतो. गणेश विसर्जन म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही. मातीपासून तयार झालेली मूर्ती जलात विसर्जित करणे म्हणजेच गणेश पुन्हा पंचतत्त्वात विलीन होणे, जीवन आणि मृत्यूच्या शाश्वत सत्याचा स्वीकार करणे होय. त्यामुळे हा विधी आत्मचिंतन व अध्यात्माचा संदेश देणारा आहे.

गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात असतो. गणेश चतुर्थीपासून गणपती बाप्पा संपूर्ण देशभर आपल्या भक्तांच्या घराघरात विराजमान होतात. गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर दहाव्या दिवशी संपतो, जेव्हा मूर्ती सार्वजनिक मिरवणुकीत संगीत आणि सामूहिक मंत्रोच्चारात नेली जाते, त्यानंतर नदी किंवा समुद्रासारख्या जवळच्या पाण्यात विसर्जित केली जाते, ज्याला विसर्जन म्हणतात. गणेश विसर्जनाच्या वेळी मंत्रोच्चार केल्याने गणपती बाप्पा प्रसन्न होतो आणि भक्तांवर आशीर्वादाचा वर्षाव करतो आणि त्यांना जीवनात सुख, समृद्धी आणि आनंद देतो. घरांमध्ये आणि सार्वजनिक पंडाल (मंडप) मध्ये गणेशमूर्ती स्थापित करणे आणि त्यानंतरचे विसर्जन हे विश्वातील निर्मिती आणि विघटन चक्राचे प्रतीक आहे.

विसर्जन मिरवणुका समाजातील ऐक्याचे द्योतक आहेत. वेगवेगळ्या समाजघटकांतील, पिढ्यांतील, वर्गांतील लोक एकत्र येतात. उत्साह, गजर, नृत्य, फुलांचा वर्षाव यातून 'सामूहिक आनंद' प्रकट होतो. परंतु हाच उत्साह कधी कधी बेभान होतो आणि ध्वनीप्रदूषण, वाहतूककोंडी, अपघात अशा समस्याही वाढतात. सर्वात गंभीर बाब म्हणजे विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, प्लॅस्टिकच्या सजावटी या थेट नद्या, तलाव, समुद्राचे पाणी दूषित करतात. जलीय प्राण्यांचा मृत्यू होतो, पिण्याच्या पाण्यावरही परिणाम होतो. विसर्जनानंतर तलावांच्या काठावर विखुरलेले कचरे, फुलांच्या माळा, न वापरलेली सजावट हे शहराचे कुरूप चित्र दाखवतात. उत्सवाचा आनंद घेणे प्रत्येकाचे हक्क आहे. पण या आनंदासोबत निसर्गाची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे. मातीच्या मूर्तींचा वापर, नैसर्गिक रंग, कृत्रिम तलावांत विसर्जन, प्लॅस्टिक टाळणे हे उपाय आपण स्वीकारले पाहिजेत. अनेक शहरांमध्ये 'घरगुती विसर्जन तलाव' ही संकल्पना लोकांनी हळूहळू आत्मसात केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.



बऱ्याच लोकांना वाटते की, गणेशाची प्राण प्रतिष्ठापना फक्त चतुर्थीलाच होते, तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिप्रदेला गणरायाची प्राण प्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असे १० दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत असे १० दिवस गणेशोत्सव साजरा होतो. गणपतीची प्राण प्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पूजा करून विसर्जन करण्याचे हे व्रत एक किंवा दीड दिवसाचे आहे. पण उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पूर्ण करण्यासाठी पाच दिवस, सात दिवसांनी गणेशमूर्तींचे विसर्जन करतात. त्यामागे कोणतेही शास्त्रीय कारण नाही. गणेशभक्त आपल्या हौसेनुसार गणेशमूर्तींचे विसर्जन दीड, दोन, पाचव्या किंवा सातव्या किंवा दहाव्या दिवशी करतात. हे दिवस आनंदात-उत्साहात गेल्यानंतर गणपती बाप्पाला निरोप देण्याची वेळ येते आणि नियमानुसार प्रथेनुसार गणेशाचे विसर्जन करण्याची प्रथा आहे.

गणपती विसर्जनाशी निगडीत अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजेच गणपतीला जल तत्वांचा अधिपती मानलं जातं. त्यांच्या विसर्जनाचं मुख्य कारण तर हेच आहे की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची पूजा-अर्चा करून त्यांना पुन्हा पाण्यात विसर्जित केलं जातं. म्हणजेच ते ज्याचे अधिपती आहेत तिथे त्यांना पोहोचवलं जातं. निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे, ज्या गोष्टीची सुरुवात होते तिचा शेवट हा नक्कीच होतो. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातून दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासून गणपतीची मूर्ती तयार होते आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मूर्तींचेच करायचे नसते तर आपल्यातील दुर्गुणांचे सुद्धा करायचे असते.

अनंत चतुर्दशीचा दिवस, एकट्या मुंबईत वर्षाला सुमारे दीड लाख मूर्तींचे विसर्जन केले जाते. गणपती विसर्जन पाण्यातच कां केले जाते, या विधी मागे सुध्दा काही धार्मिक कारणे आहेत. तसेच हिंदू धर्मात अनेक विधी हे निसर्गाशी निगडीत आहे. निसर्गाशी एकरूपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पद्धतीने कायमच दिला जातो, गणपती विसर्जनांच्या बाबतीतही असेच आहे. ज्यावेळी महर्षी व्यास महाभारताची निर्मिती करत होते, त्यावेळी गणपती बाप्पा लेखनिकाची भूमिका बजावत होते. महाभारत लिहिण्याचे काम हे दहा दिवस अविरतपणे चालू होते. त्यामुळे गणपती बाप्पांनी शरीर गरम न व्हावे म्हणून अंगाला माती लिंपल्याचे उल्लेख आहे. हा गणपती बाप्पांचा विशेष अवतार असल्यामुळे त्यांना दहा दिवसानंतर जलसमाधी देतात अशी वंदता आहे. कदाचित या दहा दिवसात बाप्पाची ऊर्जा टिकून राहावी म्हणून नैवैद्यासाठी गोडधोड, मोदक वगैरे करण्याची परंपरा आहे. अहोरात्र लिहिण्याच्या कामामुळे शरीर उष्ण झाल्यामुळे पाण्यात डुबकी मारल्याविना गत्यंतर नव्हती असेही अख्यायिका आहे. त्यामुळे गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात.



गणेश विसर्जन हा आपल्या संस्कृतीतील श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचा उत्सव आहे. मात्र तो पर्यावरणाच्या हानीचा कारणीभूत ठरू नये. 'बाप्पा पुन्हा वर्षी लवकर या'असे गजर करताना आपण त्याला प्रदूषित नद्या, रासायनिक कचऱ्याचा डोंगर दाखवला तर ती खरी भक्ती ठरेल का? आता वेळ आली आहे की श्रद्धा आणि जबाबदारी यांचा समतोल राखावा. गणेशोत्सव पर्यावरणपूरक झाला तरच आपले मोरया खऱ्या अर्थाने गजर ठरेल.

**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# समाज कल्याण च्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना: शिक्षणासाठी आधारस्तंभ**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून देशाला समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या त्रिसूत्रीवर आधारित सामाजिक एकात्मतेचा मूलमंत्र दिला. राज्यघटनेच्या कलम ४६ मध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धनाची जबाबदारी राज्यावर सोपवण्यात आली आहे. या दृष्टीकोनातून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने विविध योजनांच्या माध्यमातून वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत.

सोलापूर जिल्ह्यात समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून अनुसूचित जाती व नवबौद्ध लाभार्थ्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ही शासकीय वस्तीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांसाठी नव संजीवनी ठरली आहे.

■ शैक्षणिक सक्षमीकरणासाठी योजनांचा आधार

सोलापूर जिल्ह्यात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवासात आर्थिक अडथळे येऊ नयेत यासाठी विविध शिष्यवृत्ती योजना राबविल्या जात आहेत:

- स्कॉलरशिप योजना: चरहर उ्हढ प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात निधी जमा केला जातो. सन २०२४-२५ मध्ये १३,९५८ विद्यार्थ्यांना ₹२४.९४ कोटींचा लाभ मिळाला.
- परराज्य शिष्यवृत्ती योजना: परराज्यात शिक्षण घेणाऱ्या १० विद्यार्थ्यांना ₹२६.१३ लाखांचा निर्वाहभत्ता.
- राजर्षि शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार: इयत्ता १० व १२ मध्ये गुणवत्ताधारक १७५ विद्यार्थ्यांना ₹८.७५ लाखांचे प्रोत्साहन.
- सैनिकी शाळा शिष्यवृत्ती: निवासी सैनिकी शाळांतील ४९ विद्यार्थ्यांना ₹७.३५ लाखांचा निर्वाहभत्ता.

* डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना: शिक्षणासाठी आधारस्तंभ

शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या, परंतु उच्च शिक्षणासाठी इच्छुक असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांसाठी ही योजना वरदान ठरली आहे. इयत्ता ११वी, १२वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व निर्वाह भत्त्यासाठी ₹४३,००० पर्यंतची मदत थेट बँक खात्यात जमा केली जाते.

सोलापूर जिल्ह्यातील सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाने या योजनेचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती केली आहे:

- डिजीटल बॅनर व माहितीपत्रके
- आकाशवाणी व नामांकित वर्तमानपत्रांतून प्रचार
- जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये थेट भेटी

या प्रयत्नांमुळे सन २०२४-२५ मध्ये एकूण ८८९ विद्यार्थ्यांना ₹३.७१ कोटींचा लाभ मिळाला आहे. ही आकडेवारी केवळ आर्थिक मदतीची नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची साक्ष देणारी आहे.

■ सामाजिक व आर्थिक विकासासाठी महत्त्वाच्या योजना

सोलापूर जिल्ह्यात समाजकल्याण विभागाच्या पुढील योजनाही प्रभावीपणे राबविल्या जात आहेत:

१ रमाई आवास योजना

२६९ चौ.फुट जागेत पक्के घर बांधून अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबांना निवारा देण्याचा उद्देश. चालू वर्षात २,२८० घरकुलांना मंजुरी.

२ कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजना

भूमीहीन व्यक्तींना १००% अनुदानावर जमीन खरेदीसाठी मदत. चालू वर्षात १ लाभार्थ्याला ०.८१ हेक्टर जमीन मंजूर.

३ तृतीयपंथीय ओळखपत्र वाटप

सामाजिक समावेशासाठी ५१ तृतीयपंथीय व्यक्तींना ओळखपत्र व प्रमाणपत्र वितरित.

४ ऊसतोड कामगार महामंडळ योजना

१७ ऊसतोड कामगारांना आर्थिक मदत.

५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

१५८ नागरी व ग्रामीण वस्त्यांमध्ये मुलभूत सुविधा पुरवण्यासाठी कामांना मंजुरी.

सोलापूर जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाने केवळ योजनांची अंमलबजावणी केली नाही, तर त्या योजनांचा प्रभाव वाढवण्यासाठी जनजागृती, पारदर्शकता आणि सहभाग यावर भर दिला आहे. विशेषतः स्वाधार योजना ही सामाजिक न्यायाच्या मूल्यांना मूर्त स्वरूप देणारी आहे. ही योजना केवळ आर्थिक मदत नव्हे, तर शिक्षणाच्या माध्यमातून स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग उघडणारी सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे.

**- सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर**



# राज्य महोत्सव : गणेशोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गणेशोत्सव हा महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात अतिशय उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा महत्त्वपूर्ण सण आहे. श्री गणेश हे विघ्नहर्ता, बुद्धीचे दैवत व मंगलकार्याचे अधिपती मानले जातात. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यचळवळीच्या काळात या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले. त्यामागचा उद्देश समाजातील एकता वाढवणे व स्वराज्याच्या लढ्यासाठी लोकांना एकत्र आणणे हा होता. त्यामुळे गणेशोत्सवाला सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकही महत्त्व प्राप्त झाले.

गणेशोत्सव हा फक्त धार्मिक उत्सव नसून तो समाजाला एकत्र बांधणारा, संस्कृती जपणारा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उत्सव आहे. गणेशोत्सवाच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन, त्यावर आधारित विविध उद्योग व व्यवसाय यांना मोठ्या प्रमाणात चालना मिळते. राज्याची परंपरा व संस्कृती जपली जाते. ही परंपरा आणि संस्कृती अधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी आपला गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याची १८ जुलै २०२५ रोजी विधीमंडळात घोषणा केली. त्यानुसार शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून जाहीर केले.

गणेशोत्सवाला शासनाकडून राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आल्यानंतर या महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रम आणि इतर कार्यक्रम समन्वयनासाठी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई या कार्यालयाकडे जबाबदारी देण्यात आली.

घरगुती तसेच सार्वजनिक श्री गणेश मंडळे :

या गणेशोत्सव काळात घरगुती आणि सार्वजनिक गणेश मंडळांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धे'चा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला. यात राज्यस्तरीय प्रथम विजेत्याला रूपये ७.५० लाख तर जिल्हास्तरावरीय प्रथम विजेत्यास रूपये ५० हजार आणि तालुकास्तरीय विजेत्यांना रूपये २५ हजार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आजमितीस महाराष्ट्रभरातील ४०४ पेक्षा जास्त मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. घरोघरीच्या श्री गणेशांचे दर्शन व सार्वजनिक मंडळांच्या श्री गणेशांचे दर्शन घरबसल्या घेणे शक्य व्हावे यासाठी घरगुती व सार्वजनिक श्री गणेशांचे छायाचित्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या https://ganeshotsav.pldmka.co.in/ या पोर्टलद्वारे मोठ्या संख्येने भाविक आपल्या श्री गणेशांची छायाचित्रे सर्व गणेशभक्तांच्या दर्शनासाठी अपलोड करत आहेत. या पोर्टलद्वारे आजवर २०० हून अधिक जणांनी आपल्या घरच्या व ७० हून अधिक सार्वजनिक मंडळांनी फोटो अपलोड केले आहेत.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध गणपती मंदिरे व प्रसिद्ध सार्वजनिक मंडळाच्या गणपतींचे थेट दर्शन जगभरातील गणेशभक्तांना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, याकरिता सुरू करण्यात आलेल्या पोर्टलला देखील गणेशभक्तांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे. या पोर्टलमुळे प्रामुख्याने मुंबईचा लालबागचा राजा, मुंबईचा राजा, खेतवाडीचा गणराज, पुण्याचा दगडूशेठ हलवाई, श्री सिद्धिविनायक मंदिरातील सिद्धिविनायकाचे दर्शन, अष्टविनायकांचे व टिटवाळ्याच्या गणपतीचे दर्शन एकाच क्लिकवर उपलब्ध झाले आहे. या दोन्ही पोर्टलमुळे जगभरातील गणेशभक्तांना घरबसल्या विविध जिल्ह्यातील व शहरातील गणपतींचे अतिशय सुलभ दर्शन होत आहे.

भजनी मंडळ :

गणेशोत्सव काळात भजनी मंडळांचा मोठा सहभाग असतो. याच अनुषंगाने राज्यातील नोंदणीकृत तसेच भजन क्षेत्रातील शिखर संस्थांना रूपये ५ कोटी अनुदान देण्याबाबतची तरतूद करण्यात आली. राज्यात १८०० भजनी मंडळे नोंदणीकृत असून त्यांना प्रत्येकी २५ हजार रूपये अनुदान म्हणून देण्यात येणार आहे.

रील स्पर्धा :

गणेशोत्सवाला रील स्पर्धेच्या माध्यमातून देश-विदेशात नवे आयाम मिळावे, यासाठी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने रील स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आलेले आहे. ही स्पर्धा राज्यातील महसूल विभागीय स्तर, राज्यस्तर आणि महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटात होत आहे. रील तयार करण्यासाठी पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या थीम मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील तयार करावयाची आहे.

महसूल विभागीय स्तरावरील विजेत्या स्पर्धकाला प्रथम पारितोषिक २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार, तृतीय पारितोषिक १० हजार, उतेजनार्थ विजेत्यास ५ हजार अशा स्वरुपात पारितोषिक दिले जाईल. या स्पर्धेतील राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रुपये, द्वितीय पारितोषिक ७५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक ५० हजार रुपये, उतेजनार्थ पारितोषिक २५ हजार रुपये देण्यात येईल. तर महाराष्ट्र व भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये बक्षीस, द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये, उतेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये देण्यात येणार आहे.

विशेष उपक्रम :

गणेशोत्सवाच्या १० दिवसाच्या काळात राज्याच्या प्रत्येक विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ऑपरेशन सिंदूरद्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना राबविणाऱ्या व्यक्तींचाही गौरव करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ड आशिष शेलार यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनेस्को मानांकन मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विविध विषय घेऊनही हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. श्री गणेशाला वंदन करण्यासाठी पु.ल.देशपांडे अकादमीकडून 'आला रे आला गणराया आला' या विशेष गीताचीही निर्मिती करण्यात आली.

जागतिक व्यासपीठ :

गणेशोत्सवानिमित्त कलाकारांना महाराष्ट्र राज्याबाहेर देखील व्यासपीठ मिळणार आहे. याचाच एक भाग म्हणून २७ ते २९ ऑगस्ट, २०२५ दरम्यान वन संशोधन केंद्र डेहराडून या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आला. नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे १ सप्टेंबर २०२५ सांस्कृतिक कार्यक्रम झाला तर ३ सप्टेंबर २०२५ रोजी के एम गिरी सभागृह, बेळगाव या सीमावर्ती भागात गणेशोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. सर सयाजीराव नगर वडोदरा गुजरात या ठिकाणी म्हणजेच ४ सप्टेंबर २०२५ रोजी भाग्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ५ सप्टेंबर २०२५ रोजी गोवा राज्यात मराठी बांधवांसाठी भव्य संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात एक भरीव वाढ झाली आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार, हे नक्की

- संजय डी.ओरके,
विभागीय संपर्क अधिकारी

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### हँडल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) सिव्हिल हॉस्पिटल येथे पार्किंग मध्ये हँडल लॉक करून




ठेवलेली दुचाकी क्रमांक टीएन.६१.आर.०४५२ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ३१ ऑगस्ट रोजी घडली.याप्रकरणी डॉक्टर जयमणी शिवसुभ्रमण्यम (वय-२८,रा.पेजी जे होस्टेल सिव्हिल हॉस्पिटल) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

### विवाहितेचा छळ करत मारहाण ; पतीसह चौघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) विवाहिता ही सासरी नांदत असताना विनाकारण शिवीगाळ करून मारहाण करत शारीरिक व मानसिक छळ केल्याची फिर्याद सोनिया शुभम मुत्तुर (वय-२१,रा.मंत्रीचंडक कॉम्प्लेक्स,सम्राट चौक) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती शुभम,सासरे आडव्याप्पा,सासू मंगला,दिर सौरभ (सर्व राहणार,मंत्रीचंडक कॉम्प्लेक्स, सम्राट चौक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १८ मे २०२५ रोजी ते आजतागायत पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली.या घटनेचा पुढील तपास मपोसई. शेख या करीत आहे.

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळविली

सोलापूर : एमआयडीसी परिसरात पुन्हा एकदा वाहन चोरीची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी मुबारक इब्राहिम आत्तार (वय ५५, रा. सिद्धेश्वर नगर, नई जिंदगी, सोलापूर) यांनी आपली काळ्या रंगाची, सिल्व्हर पट्ट्यासह हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्र. एम एच १३ डी डी ०५३३) घरासमोर लॉक करून उभी केली होती. मात्र २ सप्टेंबर रात्री ८ वाजता ते ३ सप्टेंबर सकाळी ८.३० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने सायकल चोरून नेली. चोरी गेलेल्या वाहनाची किंमत अंदाजे ५०,००० रुपये आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

## माढा तालुक्यातील २०८.२ किलोमीटर रस्त्यांना प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांचा विकास कामांच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर असून मतदारसंघातील विविध पायाभूत सुविधांच्या प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा करून त्यांचे समाधान करण्यासाठी त्यांची नेहमीच ओळख राहिली आहे.



नुकत्याच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या आदेशान्वये माढा तालुक्यातील एकूण २०८.२ किलोमीटर लांबीचे रस्ते दर्जोनित करून प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे आता या रस्त्यांच्या विकासासाठी शासनाकडून निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे माढा तालुक्यातील शेतकरी, व्यावसायिक, विद्यार्थी, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या दळणवळणाच्या अडचणी मोठ्या प्रमाणात दूर होऊन सोयीसुविधेत वाढ होणार आहे.

या ऐतिहासिक निर्णयामुळे माढा तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला नवी गती मिळणार असून, हा निर्णय हा केवळ रस्ते दळणवळणापुरता मर्यादित न राहता ग्रामीण भागातील सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) पुणे मंडळाच्या प्रस्तावानुसार व जिल्हा परिषद सोलापूरच्या ठरावाच्या अधीन राहून शासनाने हा निर्णय घेतला असून त्यामुळे माढा तालुक्यातील रस्ते विकासाला मोठी गती मिळणार आहे.

या निर्णयामुळे -

१. माढा तालुक्यातील महत्त्वाचे गा-वोगावचे रस्ते आता प्रमुख जिल्हा मार्गांत समाविष्ट झाले.

२. रस्त्यांच्या दुरुस्ती, मजबुतीकरण व नव्याने होणाऱ्या विकासकामांसाठी निधी मिळण्यास प्राधान्य.

३. शेतकरी, व्यावसायिक, विद्या-र्थी व ग्रामस्थांच्या दैनंदिन प्रवासाला सोयीसुविधा.

एकूण ४७४९.१७० कि.मी. प्रमुख जिल्हा मार्गांच्या यादीत सोलापूर जिल्ह्या-चा समावेश.

आ.अभिजीत पाटील म्हणाले;

माढा तालुक्याचा शाश्वत विकास हाच माझा ध्यास आहे. शासनाच्या स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून मिळवलेला हा निर्णय माढा तालुक्याच्या जनतेसाठी एक मोठा टप्पा आहे. या रस्त्यांवर दर्जेदार विकासकामे करून नागरिकांना सोयीस्कर प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा प्रयत्न राहील.

माझ्या मतदारसंघातील लोकांच्या सोयीसाठी रस्ते हा विकासाचा कणा आहे. शासनाने दिलेला हा दर्जा केवळ रस्त्यांपुरता मर्यादित नसून, तो माढा तालुक्यातील आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाचा नवा मार्ग मोकळा करणारा ठरणार आहे. यासाठी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री, सोलापूर पालकमंत्री जयकुमार गोरे आणि अधिकारी वर्ग व शासनाचे मनःपूर्वक आभार.

# भूमी अभिलेख कार्यालयाच्या माध्यमातून शासन आपल्या दारी, महास्वामित्व योजनेअंतर्गत नागरिकांना सनद प्रमाणपत्राचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : भूमी अभिलेख कार्यालयाच्या माध्यमातून सध्या नागरिकांना मालमत्ता पत्रक वाटप करण्यात येत आहे. स्वामित्व योजना मालमत्ता पत्रक वितरण हा उपक्रम महसूल व भूमी अभिलेख विभाग ,ग्राम विकास विभाग आणि भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानातून पार पडला.




स्वामीत्व योजना ही केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. महाराष्ट्र मध्ये महास्वामित्व योजनेअंतर्गत नागरिकांना सनद वाटप करण्यात येत आहे. भूमी अभिलेख कार्यालय सिंदखेड राजा येथे नागरिकांना सनद वाटप करण्यात आल्या आहेत.

या मालमत्ता पत्रकाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाची साथ व जमिनीचा अधिकार आपल्या हातात येणार आहे. हे मालमत्ता पत्रक आपल्या घराच्या जागेचे महत्वाचे कागदपत्र असणार आहे.

हे मालमत्ता पत्रक म्हणजे सेवा एक फायदे अनेक असे आहे,

१) अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने गावठानातील मिळकतीचे अचूक मोजमाप ,नकाशा आणि मालमत्ता पत्रक तयार करणे आता झाले सोपे व जलद

२) सीमा निश्चिती आणि मोजमापाची कामे आता अधिक प्रभावीपणे आणि वेळेत पूर्ण होतील

३) मालमत्तेची कायदेशीर मालकी आणि सुरक्षिततेची हमी

४) कर्ज मिळण्याची सुलभ सुविधा

५) जमिनीशी संबंधित मतभेदांचे त्वरित निराकरण मालमत्तेचे विभाजन अधिक सुलभ

६) गावांच्या आर्थिक प्रगतीला नवी दिशा व चालना

या मालमत्ता पत्रकातून वरील सर्व फायदे नागरिकांना मिळणार आहेत.

भूमी अभिलेख सिंदखेड राजा कार्यालयाचे तीन पथके हे शिंदी, मोहाडी आणि रताळी या गावामध्ये गेले होते आणि त्यांनी तिथे मार्गदर्शन शिबीर घेऊन तेथील नागरिकांना सनद प्रमाणपत्राचे महत्व सांगून त्याचे वाटप केले आहेत.या तिन्ही पथकाच्या माध्यमातून एकूण १,०१,०००/- ₹(एक लाख एक हजार रुपये ) एवढी विक्रमी सनद फीस ची वसुली करण्यात आली.

शिंदी येथील पथकामध्ये उप अधीक्षक मारोती थोरवे, भुमापक प्रकाश शिंदे हे होते तर मोहाडी येथील पथकामध्ये निमतनदार राजाराम चोखट, भुमापक आयुष नायगावकर आणि रताळी येथील पथकामध्ये परिरक्षण भुमापक गोपाल वाघमारे,श्रीकांत बुलबुले छाननी भुमापक उपस्थित होते.

सिंदखेड राजा येथील कार्यालयामध्ये मनुष्यबळ कमी असून सुद्धा असे लोकाभिमुख कामे करून कार्यालयाला थेट जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम सध्या उप अधीक्षक मारोती थोरवे आणि पूर्ण टीम करत आहे.

शिंदी येथील सरपंच अशोक खरात आणि ग्रामविकास अधिकारी दिनकर काळे, रताळी येथील सरपंच समाधान पाटील आणि ग्राम विकास अधिकारी, मोहाडी येथील सरपंच बबनराव काळे आणि ग्राम विकास अधिकारी पडघन मॅडम या सर्वांनी तसेच सर्व ग्रामस्थांनी खूप सहकार्य केले त्याबद्दल उप अधीक्षक थोरवे यांनी सर्वांचे आभार मानले.

# एम-सॅन्ड युनिट स्थापन करण्यासाठी अर्जदारांनी महाखनिज प्रणालीवर अर्ज करावेत : अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर/जिमाका : एम-सॅन्ड युनिट स्थापन करण्यासाठी अर्जदारांनी महाखनिज प्रणालीवर अर्ज दाखल करणे आवश्यक असून, त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे Consent to Establish व Consent to Operate प्रमाणपत्र, नियोजन प्राधिकरणाची नाहरकत, अकृषिक परवानगी, जिल्हा उद्योग केंद्राची नोंदणी इत्यादी कागदपत्रांची पूर्तता अनिवार्य आहे, अशी माहिती अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी दिली.

शासनाच्या एम-सॅन्ड (Manufactured Sand) धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधित विभागांची बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा खनिकर्म अधिकारी नीलिमा जाधव, सार्वजनिक बांधकाम विभाग, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जिल्हा परिषद, नगर रचना विभाग, भुजल विकास यंत्रणा, महावितरण, प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूमि अभिलेख विभाग यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

> **सोलापूर जिल्ह्यात एम-सॅन्ड धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय बैठक**

यावेळी अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी नैसर्गिक वाळूची मर्यादित उपलब्धता आणि पर्यावरणपूरक मानकांमुळे निर्माण झालेल्या अडचणींचा उल्लेख करत, विकासकामांसाठी एम-सॅन्ड ही योग्य पर्यायी सामग्री असल्याचे स्पष्ट केले. शासनाने दिनांक २३ मे व १७ जुलै २०२५ रोजीच्या निर्णयांद्वारे याबाबत धोरण निश्चित केले आहे.

एम-सॅन्ड युनिट स्थापन करण्यासाठी अर्जदारांनी महाखनिज प्रणालीवर अर्ज दाखल करणे आवश्यक असून, त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे Consent to Establish व Consent to Operate प्रमाणपत्र, नियोजन प्राधिकरणाची नाहरकत, अकृषिक परवानगी, जिल्हा उद्योग केंद्राची नोंदणी आदी कागदपत्रे आवश्यक असल्याचे श्रीमती ठाकूर यांनी यावेळी स्पष्ट केले.

आजअखेर सोलापूर जिल्ह्यातील ५१ अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले असून, संबंधित विभागांनी तातडीने नाहरकत अहवाल व आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्याच्या सूचना अपर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर यांनी दिल्या. अर्जदारांना विभागीय कार्यवाहीची माहिती देण्यासाठी पुढील १५ दिवसांत एकत्र कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे.

# अव्यवसायिक वाहनांसाठी वार्षिक टोल (फास्टॅग) पास सवलत लागू

**वार्षिक टोल पासची किंमत ३ हजार इतकी आहे.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : भारत सरकारच्या राजपत्र अधिसूचनेनुसार १५ ऑगस्ट २०२५ पासून देशभरातील अव्यवसायिक वाहनांसाठी वार्षिक टोल (फास्टॅग) पास सवलत लागू करण्यात आली आहे, अशी माहिती भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

ही योजना कार, जीप, व्हॅन यांसारख्या अव्यवसायिक वाहनांसाठी लागू असून, वार्षिक टोल पासची किंमत ₹३,०००/- इतकी आहे. पासची वैधता एक वर्ष किंवा २०० एकेरी फेऱ्या यापैकी जे आधी पूर्ण होईल ते लागू राहील. हा पास राष्ट्रीय महामार्ग व द्रुतगती मार्गावरील टोल प्लाझांसाठी वैध असून राज्य महामार्गावरील टोल प्लाझांसाठी अवैध राहील.

वार्षिक टोल पास मिळवण्यासाठी तसेच त्याचे सक्रियता व नूतनीकरण राजमार्ग यात्रा मोबाईल प व छक्ख च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी १०३३ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान निर्णय

# कोर्टाकडून गणेश विसर्जन मिरवणुकीत डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईट वापरण्यास जिल्हाधिकारी यांचा बंदी आदेश कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : -गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटचा वापर नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम करणारा ठरू शकतो, या अनुषंगाने जिल्ह्यातील अनेक नागरिक, ज्येष्ठ नागरिक व विविध सामाजिक संघटना यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदने सादर केलेली होती. या अनुषंगाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिनांक २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत सार्वजनिक गणेश मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटचा वापर न करण्याचे आदेश दिले होते.

> **जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडून २६ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईट शो ला नागरिकांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो या कारणांनी बंदी घातली होती**

परंतु जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या आदेशा विरोधात श्री. योगेश पवार यांनी माननीय दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सोलापूर यांच्या कोर्टात स्टे मागितला होता. व जिल्हाधिकारी यांनी गणेश विसर्जन मिरवणुकीत डॉल्बी सिस्टीम व लेझर शो ला घातलेली बंदी ही बेकायदेशीर असल्याने त्याला कोर्टाने स्थगिती देण्याबाबत याचिका दाखल केली होती.

परंतु लोकांच्या आरोग्याच्या व सुरक्षेच्या दृष्टीने माननीय दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सोलापूर यांच्या कोर्टाने जिल्हाधिकारी सोलापूर यांनी जिल्ह्यात डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईट शो ला बंदी घातलेल्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिनांक २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत साठी जारी केलेले बंदी आदेश कायम राहणार आहेत.

# रब्बी २०२५-२६ हंगामासाठी पीक प्रात्यक्षिकांसाठी शेतकरी गटांना अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत अन्नधान्य, वाणिज्यिक पीके आणि राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत तेलबिया पिकांसाठी रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. गहू, कडधान्य, पौष्टिक तृणधान्य, ऊस, करडई, मोहरी व सूर्यफूल या पिकांच्या उत्पादकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी गटांनी या योजनेंतर्गत अर्ज करून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले केले आहे.

सदर प्रात्यक्षिकांसाठी दि. ३१ मार्च २०२४ पूर्वी शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी व कृषी क्षेत्रातील सहकारी संस्था पात्र आहेत. प्राधिकृत सदस्याने महाडीबीटी पोर्टलवर अर्ज सादर करावा. अर्ज सादरीकरणाची सुविधा दि. २ सप्टेंबर २०२५ पासून उपलब्ध असून, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्त्वावर गटांची निवड होणार आहे.

अर्ज करताना https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin/Agrilogin या संकेतस्थळावर बियाणे वितरण, प्रात्यक्षिक, फ्लेक्सी घटक, औषधे आणि खते या टाईल अंतर्गत अर्ज करता येतील. अर्जदार गट सदस्यांचा ऋ्रीशी खऊ असणे आवश्यक आहे.

# पंढरपूरात पर्यावरणपूरक गौरी-गणेश सजावट स्पर्धेला नागरिक, मंडळांचा उस्फूर्त प्रतिसाद

## पंढरपूर नगरपरिषद व पोलीस प्रशासनातर्फे पर्यावरणपूरक गौरी-गणेश सजावट स्पर्धा; ११६ स्पर्धकांचा सहभाग; मूल्यमापनासाठी तज्ज्ञ परीक्षकांचे ५ पथके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर नगरपरिषद आणि शहर पोलीस प्रशासन पंढरपूर यांच्या वतीने पर्यावरण पूरक गौरी-गणेश सजावट स्पर्धा २०२५ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महिला भगिनी, गणेश मंडळे, तसेच विविध सामाजिक संस्थांकडून या उपक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद लाभला असल्याची माहिती मुख्यधिकारी महेश रोकडे यांनी दिली.







पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देत पारंपरिक पद्धतीने सजावट करण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे तसेच टाकाऊ पासून टिकाऊ, सजावटीसाठी प्लास्टिकचा वापर न करता पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर यासाठी मुख्यता ही स्पर्धा आयोजित करण्यात आली असल्याचे मुख्याधिकारी रोकडे यांनी सांगितले.

सजावट स्पर्धेत एकूण ११६ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. प्रत्येक स्पर्धकाने आपापल्या सर्जनशीलतेला वाव देत अत्यंत आकर्षक, पारंपरिक आणि पर्यावरणपूरक देखावे साकारले. स्पर्धेचे मूल्यमापन करण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांचे व तज्ञ परीक्षकांचे ५ स्वतंत्र पथके नेमण्यात आली होते. सदर पथकांनी घरोघरी भेटी देत पर्यावरण पूरक मूर्ती आणि सजावट, प्लास्टिक,थर्माकोलमुक्त सजावट, टाकाऊ पासून टिकाऊ, घरगुती कचरा व्यवस्थापन आणि डस्टबिनचा वापर या आधारे गुणांकन करून परीक्षण केले.

या स्पर्धेत जनावरांविषयी माणुसकीचा संदेश देणारा भावनिक देखावा कोल्हापूरच्या 'माधुरी' हत्तीणीची गोष्ट, आपल्या प्रथा, परंपरा व संस्कारांना अधोरेखित करणारा. मराठी सण साजरे करा -आपला पारंपरिक वारसा जपा , भक्ती व समर्पण यांचे दर्शन घडवणारा पांडुरंग भक्त गोरा कुंभाराचा जिवंत देखावा, श्री. विठ्ठल-रुक्मिणी पंढरपूर प्रमुख चार यात्रा पारंपरिक देखावा, केदारेश्वर मंदिर हरिश्चंद्रगड, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवणारा पारंपरिक वाडे, जीवनशैली, चालीरीती व परंपरा देखावा, जेजुरीचे खंडोबा मंदिर आदी उल्लेखनीय आणि सामाजिक संदेश देणारे देखावे होते. या उपक्रमासाठी मुख्याधिकारी महेश रोकडे, प्रशासकीय अधिकारी श्री बोडरे , पोलीस निरीक्षक विश्वजित घोडके वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत व विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी श्री रोकडे यांनी दिली.

# अकलूज पोलिसांची मोठी कारवाई पोलीस ठाणे हद्दीतील चोरी गेलेल्या तीन मोटरसायकली पोलिसांनी केल्या जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अकलूज पोलीस ठाणे हद्दीतील चोरीला गेलेल्या तीन मोटरसायकली जप्त केल्यास अकलूज पोलिसांची कौतुकास्पद आहे.

दिनांक ०९/०८/२०२५ रोजी रात्री ०८.३० सुमारास हरी नगर माळीनगर तालुका माळशिरस येथून यांची चोरीला गेली मोटरसायकल असल्याबाबत आकलून पोलिसांना ठाणे येथे आणण्यात छोट्याविरुद्ध तक्रार दिलेली होती. अकलूज पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर ५१२/२०२५ बीएनएस ३०३(३) प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल १०९८ व्ही बी घाडगे हे करीत आहेत अकलूज पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो हेड कॉन्स्टेबल १०९८ घाडगे पोलीस हेड कॉन्स्टेबल १५६ साले,पो. को./५१मा. हे अकलूज शहरात पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की पंचवटी येथील एक ही समनामे शंकर सुनील डांगे यांच्याकडे चोरी या गाड्या आहेत अशी माहिती मिळाली मिळाली असता शंकर सुनील डांगे याला ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी खालील प्रमाणे वाहने काढून दिली.

१) अकलूज पोलीस ठाणे गडील गुन्हा रजिस्टर नंबर ५१२/२०२५ मधील एक होंडा ड्रीम योगा कंपनीची मोटरसायकल आरटीओ एम एच ४५ ही ४६ ५१ असा असलेली जु.वा.

२) अकलूज पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १६१/२०२५एक होंडा कंपनीची युनिकॉर्न क*** रंगाची मोटरसायकल तिचा आरटीओ नंबर एम एच ४५ ए जी १८८३ असा असलेली जु.वा.



३) धाराशिव इथून चोरलेली एक टीव्हीएस कंपनीची अपाचे काळा रंगाची मोटरसायकल तिचा आरटीओ क्रमांक एम एच २५ प्स ०१५३ असा असलेली गु.वा.

# देशभरात ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉनचे आयोजन : केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडविया

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्म दिनानिमित्त १७ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा देशभरात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत युवकांमध्ये क्रीडाप्रेम जागविण्यासाठी व निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी देशभरातील ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिली.

या संदर्भात झालेल्या दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत डॉ. मांडविया यांनी राज्यांच्या क्रीडा मंत्र्यांशी संवाद साधला. यावेळी केंद्रीय युवा कार्य व क्रीडा विभागाचे सचिव हरिरंजन राव उपस्थित होते. राज्याचे क्रीडा मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांच्यासह विविध राज्यांचे क्रीडा मंत्रीही उपस्थित होते.

मंत्री डॉ. मांडविया म्हणाले की, युवकांचे आरोग्य सक्षम ठेवणे आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेम जागवणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे या कार्यक्रमांना प्रत्येक राज्याने सक्रिय सहभाग देऊन यशस्वी करावे. या पंधरवड्यात २१ सप्टेंबर रोजी ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉनचे आयोजन करण्यात येणार आहे. तर, यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर : एकतेचा संदेश देणाऱ्या पदयात्रेचे आयोजन देशभर करण्यात येणार आहे. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यांत तीन दिवस एकता, राष्ट्रप्रेम, एक भारत श्रेष्ठ भारत व विकसित भारत यांचा संदेश देणाऱ्या पदयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. दरम्यान, नशा मुक्त भारत अभियान राबविण्यात येणार आहे. देशभरातील १०० सामाजिक व अध्यात्मिक संस्थांचा सहभाग घेऊन हे अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच संसद खेल महोत्सवाचे आयोजनही करण्यात येणार असून, राज्यांनी यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी यावेळी केले.



# जय हनुमान जय श्रीराम गणेश उत्सव मंडळ व अनलोम यांच्या सहकार्याने आरोग्य शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :

मुख्यमंत्री सहाय्यता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष अनुगामी लोकराज्य महाअभियान यांच्या समन्वयाने मा.श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) श्री गणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान - २०२५ आयोजित मौजे वागदरी येथे विविध आजारावर मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले यावेळी मल्लिनाथ शेळके चेअरमन शेळके प्रशाला, भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप, गोगांवचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, शाणप्पा मगाणे, धोंडाप्पा यमाजी, वागदरीचे सरपंच शिवानंद घोळसगाव, घालया मठपती, तंटा मुक्त समिती अध्यक्ष लक्ष्मण सलगरे, महादेव सोनकवडे, श्याम बाबर, हनीफ मुल्ला, असलम मुल्ला किरनाळी, डॉ. खलील सय्यद, डॉ. लिगराज नडगेरी, डॉ. प्रदीप पोमाजी यांच्या प्रमुख उपस्थित उद्घाटन करण्यात आले.

वागदरी येथील श्री हनुमान मंदिर चावडी येथे आयोजित कार्यक्रमात विविध आजारावर तपासणी करण्यात आले. यावेळी १५० जणांचे आरोग्य तपासणी करण्यात आले दहा लोकांनी रक्तदान केले.

यावेळी बोलताना जिल्हा समन्वयक पांडुरंग शिंदे म्हणाले की मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत अर्थ सहाय्य प्राप्त होऊ शकणारे व्याधी विकार / आजार हृदयरोग उपचार, बायपास सर्जरी हृदय वाल्व्ह बदले/दुरुस्ती अँजिओप्लास्टी पेसमेकर बसविणे, न्यूरोलॉजिकल विकार, मेंदूशी संबंधित शस्त्रक्रिया, मणका आणि मज्जातंतू संबंधित शस्त्रक्रिय, किडनी प्रत्यारोपण (ट्रान्सप्लांट) गंभीर अपघात / जखम उपचार, गंभीर भाजण्याचे उपचार, अपघातजन्य गंभीर जखमा, कॅन्सर उपचार, शखक्रिया केमोथेरपी, रेडिएशन थेरपी, कॉक्लिअर इम्लांट, सिस्टीक फायब्रोसिस मधुमेहाच्या गंभीर जटिलता, यकृत (लिव्हर) प्रत्यारोपण, फुफ्फुत्त (लंग) प्रत्यारोपण अस्थिमजा (बोन मॅरो) प्रत्यारोपण, थलेसिमिया हिमोफिलिया सिकल सेल अनिमिया स्पायनल मस्क्युलर अॅट्रोफी (SMA) आशा विविध आजारावर शासनाच्या विविध योजने अंतर्गत मोफत उपचार करण्यात येत असतो त्याची ग्रामीण भागातील लोकांनी लाभ घ्यावे असे सांगितले.



यावेळी जमादार साहेब, सरसंबे मॅडम, परीट मॅडम वागदरी सर्व आशा वर्कर, समर्थ ठोंबरे, प्रदीप कनमुसे सचिन मडपती बसवराज मठपती सचिन स्वामी, ओंकार ठोंबरे, अमर मठपती, प्रतीक आगरखेड, शशांक वरनाळे, समर्थ सुरवसे, अमोल माने, विरेश मठपती. सचिन पोमाजी,सिद्धा मठपती, श्रीशैल पटणे, परमेश्वर, जय हनुमान जय श्रीराम गणेश उत्सव तरुण मंडळ पदाधिकारी व अनलोम आयोजक, श्री प्रकाश पोमाजी सुनील सावंत महेश हजगी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

कार्यक्रम सूत्रसंचालन महादेव सोनकवडे यांनी केले आभार प्रदीप पोमाजी यांनी केले.

## पशुपालकांनी सतर्क राहून पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा

# पुरंदर तालुक्यामध्ये ३२ हजार जनावरांचे लम्पी लसीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : लंफी आजाराच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. आजअखेर ३२ हजारांहून अधिक पशुधनांचे लसीकरण करण्यात आले आहे. जनावरांना लम्पी आजारसदृश लक्षणे आढळल्यास पशुपालकांनी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पशुधन विकास अधिकारी डॉ. अस्मिता सताळकर यांनी केले आहे.



पुरंदर तालुक्यातील ३२ हजार पशुधनांचे लसीकरण करण्यात आले आहे. उर्वरित पशुधनास लसीकरणाची कार्यवाही सुरू आहे. आजाराग्रस्त जनावरांची संख्या एकूण ४४२ असून उपचाराअंती बरे झालेली ३३६ तर ४ जनावरांचा मृत्यू झाला आहे. उर्वरित जनावरांवर उपचार सुरू आहेत. दवाखान्यात १४ हजार लसींचा साठा उपलब्ध आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून जनावरांचे लसीकरण करण्यासोबतच त्यांच्यावर मोफत उपचार करण्यात येत आहेत.

लंम्पि आजाराविषयीं माहिती पुढील प्रमाणे

कॅप्री पॉक्स विषाणूपासून गाय वासरे, बैल गोवर्गीय जनावरांना लम्पी आजाराचा संसर्ग होतो. डास, माशा, गोचीडापासून प्रसार होते. या आजाराचा आजारी जनावरांच्या अंगावर गाठी, ताप, डोळे व नाकातून स्राव, वजन कमी होणे, दुधात घट अशी लक्षणे आढळून येतात. या कालावधीत जनावरांचे विलिगीकरण करावे. त्यांना शुद्ध सकस आहार द्यावा. आजारी जनावरांची विशेष काळजी घ्यावी. लम्पी आजाराबाबत व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यात येत आहे, असे पुरंदरच्या पशुसंवर्धन अधिकारी डॉ सौ सताळकर यांनी सांगितले.

लसीकरणाचा परिणाम २१ दिवसांनी दिसतो. आजारी जनावरांची माहिती त्वरित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना द्यावी, असे आवाहन सताळकर यांनी केले आहे.

# रेशीम विभाग आपल्या दारी - शेतकऱ्यांना रेशीम उद्योगासाठी पुन्हा आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हा रेशीम कार्यालय, सोलापूर यांच्यावतीने रेशीम विभाग आपल्या दारी ही विशेष मोहीम दि. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात येत आहे. दोन वर्षांपूर्वी रेशीम योजनेसाठी नोंदणी केलेल्या, परंतु तुती लागवड न करणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरी जाऊन रेशीम उद्योगाची माहिती देणे, उद्योग सुरू करण्याचे आवाहन करणे आणि तुती लागवड न करण्यामागील कारणांचा अभिप्राय घेणे, हा या मोहिमेचा उद्देश आहे, अशी माहिती जिल्हा रेशीम अधिकारी विनीत पवार यांनी दिली आहे.

रेशीम विकास योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून राबविण्यात येत असून, अल्पभूधारक शेतकऱ्यांना सहभागी करून घेतले जाते. एका गावातील किमान ५ शेतकऱ्यांनी ग्रामसभेच्या संमतीने ग्राम रोजगार सेवकांच्या मार्गदर्शनाखाली अर्ज करावा लागतो. प्रति एकर ₹५०० नोंदणी शुल्क रेशीम कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

**मनरेगा अंतर्गत लाभ:**

- तुती लागवड व जोपासना: ₹२,१२,७८४ (तीन वर्षांत मजुरी)
- किटक संगोपनगृह बांधकाम: ₹६६,४५६ (मजुरी)
- साहित्य खर्च: ₹१,५३,०००

एकूण लाभ: ₹४,३२,२४० (तीन वर्षांत)

**बहुभूधारक शेतकऱ्यांसाठी सिल्क समग्र २ योजना:**

- तुती लागवड: ₹४५,०००
- सिंचन व्यवस्था: ₹४५,०००
- संगोपनगृह बांधकाम: ₹२,४३,७५०
- संगोपन साहित्य: ₹३७,५००
- निर्जतुकीकरण औषधे: ₹३,७५०

काम पूर्ण झाल्यानंतर अनुदान मंजूर

**₹१ तुती लागवडीचे राज्यस्तरीय उद्दिष्ट:**

मा. मुख्यमंत्री यांनी पावसाळ्यात १० कोटी तुती वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट जाहीर केले असून, रेशीम संचालनालयाला ४ कोटींचा लक्षांक देण्यात आला आहे. त्यापैकी २४ लाख वृक्ष (४०० एकर) लागवडीचे उद्दिष्ट सोलापूर जिल्ह्यासाठी निश्चित करण्यात आले आहे.

शेतकरी बांधवांनी पर्यावरणपूरक आणि शेतीपूरक रेशीम उद्योग सुरू करून रेशीम कोष निर्मितीच्या माध्यमातून उत्पन्नवाढ साधावी, असे आवाहन जिल्हा रेशीम कार्यालय, रेशीम पार्क, गट नं. ४२३/२, मौजे हिरज, ता. उत्तर सोलापूर यांच्यावतीने करण्यात आले आहे.